शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
17 फरवरी 2021
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

# कुडियाटट्म आणि भास : एक अंतर्संबंध

राहुल राम हळदे (शोधार्थी)
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड, महाराष्ट्र, भारत
डॉ.संजय पाटील देवळणकर (निर्देशक)
नाट्यशास्त्र विभाग
सौ.के.एस.के. महाविद्यालय
बिड, महाराष्ट्र, भारत

शोध संक्षेप

*भारतीय पारंपारिक लोकसंस्कृती मध्ये कुडीयाटट्म हा केरळ येथील लोकनाट्य प्रकार 2000 वर्षापेक्षा अधिक पुरातन असल्याचे आढळून येते। हा कला प्रकार भरतनाट्य शास्त्राचे नियम पालन करून कुथंबलम्। ह्या मंदिरातील मंचावर खेळल्या जातोण् या लोकनाट्याच्या पुरुष नट ह्याला ष्चाक्यारष् आणि महिलानटीस नांग्यार म्हणतात। रंगमंच व्यवस्था सांभाळणाऱ्या व्यक्तीस नांबियार असे म्हणतात कुडीयाटट्म नाट्यशैलीत एकच कलावंत एकाच अंकाला अनेक दिवस खेळतो त्याला improvise करण्याचा प्रयत्न तो करत असतो। हा कलाप्रकार पारंपारिक तसेच सनातन असल्याने ह्या कलाप्रकाराला बाहेर सादर करण्यास सक्त मनाई केली गेलेली आहे। आधुनिक युग भासांच्या नाटकाचा भारतात शोध घेत असताना तिकडे अनेक वर्षापासून भासांचे नाटक चाक्यार समूह खेळत असताना आपल्याला दिसते, परंतु ह्या शैलीची व्याप्ती खऱ्या अर्थाने टीण्गणपती शास्त्री ह्यांनी केली कारण त्यांनी भासांची 13 नाटके प्रथम शोधून ती जगविख्यात केलीण्त्यामुळे त्यासोबतच कुडीयाटट्म हा कला प्रकार आपोआपच जगविख्यात झाला। ह्या नाट्यप्रकारात ऐकून 20 नाटके खेळली जातात। त्यापैकी 13 नाटके हि एकट्या भासांची आहेत, कारण भास हा improvise करण्यासाठी नाटकात वाव देतो त्याशिवाय अभिनेत्याला अभिनय करण्यास प्रचंड जागा देतो। त्यामुळे ह्या रंगशैलीत नाटककार भास हे तंतोतंत बसतात असेकुडीयाटट्म चे जाणकार सांगतातण् म्हणूनच कुडीयाटट्म व नाटककार भास ह्यांचा अंतरसबंध स्पष्टपणे दिसून येतोण् त्यामुळेह्या शोध पत्रिकेचे शीर्षक कुडीयाटट्म व भास : एक अंतरसंबंध समर्पक आहे।*

## प्रस्तावना

कुडियाटट्म हा भारतातील पारंपारिक संस्कृत नाटकाचा पुरातन व इतिहासिक उपलब्ध असा कला प्रकार आहे। काही संस्कुत नाटकाचे कलाप्रकार कालानुरूप नष्ट झाले परंतु कुडियाटट्म हा कलाप्रकार केरळ च्या रंगभूमीवर गेले। अनेक शतकापासून संस्कृत नाटके प्रस्तुत करत आला आहे।

कुडियाटट्म हि कला परंपरा केरळच्या मंदिरात आपल्या 2000 वर्षाच्या प्राचीन प्रथेने आजही मोठया दिमाखाने लोकरंजन व मंदिरातील विधी,अनुष्ठान करताना दिसते। हा कला प्रकार केरळ राज्यातील ज्या मंदिरातील रंगमंचावर होतो त्याला 'कुथांबलम्' असे म्हणतात, भरत-नाटयशास्त्राचे सर्व नियम स्वीकारत व स्वतः चे त्यानुषंगाने वापरलेले नाटकाचे संकेत त्याला 'अटट्प्रकार' व 'क्रमदिपिका' म्हणतात। शुद्ध

अर्थाने हे रंगमंचाचेजंहम उमदनंसआहे ज्यामाध्यामातून कलावंत नाटकाचे व्याकरण पाळतात। सादरीकरण करणारा रंगमंच नाटय-मंडपा प्रमाणे विकृष्ट,चतुरस्त्र, व त्रयस्त असतो, शिवाय काही भागात अर्ध-गोलाकार सुध्दा असतो असे दिसते।

पुरुष अभिनेत्याला 'चाक्यार' म्हणतात, जो चाक्यार नट समूह असतो व स्त्री नटी ला 'नांग्यार'म्हणतात। वेशभूषा, मंच-सज्जा, मंच-व्यवस्था देखरेख करणायाला 'नांबियार' म्हणतात हे सर्व केरळ भाषेतील नावे आहेत। मणी माधव चाक्यार हे भारतातील उत्कृष्ट कुडियाटट्म चे प्रदर्शक व प्रसिध्द गुरु आहे।

मल्याळम शब्द कुडियाटट्म ह्याचा साहित्यिक अर्थ Assembling Acting म्हणजेच 'अभिनयाचा जुडाव' असा होतो। म्हणजेच जिथे अभिनयाचे अनेक गुणधर्म एकत्र येतात, 'कुडि' म्हणजे एकत्र व 'आटट्म' हा अभिनय असा शब्दशः अर्थ काढल्या जातो।

पारंपारिक संस्कृत नाटकचे पूर्ण नाटक नघेता त्यातील एखादा प्रसंग ते आपल्या अभिनयाच्या जोरावर रात्र-रात्र भर वाढवितात, त्यातवेगवेगळे IMPROVISATION केल्या जाते। फक्त एकाच अंक किती तरी दिवस खेळल्या जाताना दिसतो, कधी कधी 30 ते 40 रात्र सुध्दा एका अंकात कमी पडतात। वेशभूषा, रंगभूषा न बदलवातही एक अभिनेता त्या अंकातील अनेक दृश्य एकटाच सदर करताना दिसतो तोच दृश्यातील वेगवेगळे पात्र सदर करतो व काही सह कलावंत त्याला मदत करतात।[1]

जगातील आंतराष्ट्रीय रंगमंचावरचा इतिहास असणारी व एक जागतिक स्तरावर नोंद घेणारी 2000 वर्षा पूर्वीची नाटय संस्कृती जपणारी अशी विधी परंपरा म्हणून कुडियाटट्म कडे पहिल्या जाते। नाटय-शास्त्र ह्यांचे समवेत व त्याचेच अनेक लक्षण घेऊन तसेच त्याच्या नियमाचे पालन करून चालणारी हि परंपरा असून काही जाणकार मंडळी ने त्याला ईसा पूर्व 200 पासून ते 200 ईस्वी ह्या शतकाच्या दरम्यानचा कालखंडात आणून ठेवलेलं दिसते।[2]

UNESCO ह्या जागतिक संघटनेने ह्याला 2000 वर्षाचा इतिहासाची परंपरा व विधी असल्यामुळे त्याला जागतिक हेरीटेज म्हणून घोषित केले आहे, त्याचे संरक्षण व हि कला टिकवण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत त्यात संगीत नाटक अकादमी ह्या भारतातील संस्थेचे योगदान पण आहे।"[3]

भारतीय संस्कृती मध्ये व परंपरा मध्ये कुडियाटट्म हि नाटय-नृत्य प्रधान सौंदर्यात्मक अनुभूती टिकवत जाणारा कला प्रकार, आजही लोक रंजन करताना आढळतो। ह्या नाटकात जास्त करून नाटय-धर्मी वैशिष्टय घेऊन शैलीबध्द अभिनयाचा वापर केल्या जाताना दिसतो, अर्थात ह्या शैली मध्ये नाटकीय संवाद व संवादाशी खेळण्याचा एक वेगळाच स्कोप मिळतो व त्याला अनुसरून असलेली शैलीबध्द अभिनयाची जोड जी विस्तृत करून केलेली कृती असते। ह्यामुळे नाटकाच्या काल्पनिक जगताला एक वेगळाच स्पर्श केला जातो।

कुडियाटट्म ह्या रंग-प्रकारचे एक पिढीकडून दुसर्या चाक्यार पिढीकडे हस्तांतर करून हि परंपरा हजारो वर्ष पासून टिकवून ठेवली आहे, भारतातील प्राचीन मंदिरात ह्याची प्रस्तुती होत होती। ह्याला श्रद्धा भाव म्हणून पूजा म्हणून सेवा भावाने हे नाटक खेळल्या जायचे ते सेवा करत होते। म्हणून प्राचीन साहित्यात 'कुथू', चाक्यार कुथू ह्यांचा उल्लेख मिळतो। जसे पल्लव, चोळ, चेरा कालखंडाच्या साहित्यात ह्याचा स्पष्ट उल्लेख आहे असे जाणकार सांगतात।

शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
17 फरवरी 2021
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

कुडियाटट्म हि प्रथा काहीशी सनातनी असल्यामुळे त्याचा कोणत्याही विषयात,घटनेत बदल करणे ह्याची मुळीच परवानगी नाही व असे करणे म्हणजे हा जणू द्रोहच असल्याचे मानल्या जाते। म्हणून ह्या कला प्रकाराला कोणीही मंदिरा बाहेर घेऊन जाण्याचे धाडस कोणीही करू शकले नाही, जे उपासक व जाणते लोक होते, ते मंदिरातच येऊन ही कला पाहायचे। म्हणून हा कला प्रकार जगात काही काळ अनभिन्न राहिला त्याची तेवढी ओळख जगास झाली नाही, फक्त कराल प्रांतात काही लोकांनाच हे माहित होत असे दिसते। परंतु नंतरच्या काळात अर्थात 1948 मध्ये चाक्यार नट-वर्गापैकी एक पैनकुलाम रामा चाक्यार ह्याने धाडस करून हा लोक कला प्रकार मंदिरा बाहेर करण्याचे ठरवले, त्यानुसार त्याचेवर अनेक टीका झाल्या, समाजात त्याचा विरोध झाला, तसेच चाक्यार समूहाने त्याला अनेक जागी विरोध केला। मग प्रथम शब्द प्रधान अर्थात संवाद प्रधान असे प्रस्तुतकरण 'चाक्यार-कुथू' ह्याचे किटट्रकारा येथील एका घरी त्याची प्रस्तुती करण्यात आली। व त्या नंतर त्याचे निरंतर प्रदर्शन बाहेर होत राहिले असे दिसते त्यानंतरच्या काळात म्हणजेच 1956 मध्ये संपूर्ण कथानक असलेले प्रथम बाहेरचे कुडियाटट्म हे नृत्य नाटय गणपती हायस्कूल कोझिकोड केरळ प्रांतात झाले, आणि 1965 ला केरला कलामंडलम् येथे कुडियाटट्म ह्याचे अधिकृत प्रशिक्षण सुरु झाले। आजही हि संस्था कुडियाटट्म, मोहिनीयाटट्म, व कथाकलीचे अधिकृत प्रशिक्षण देणारी संस्था म्हणून ख्यातनाम आहे। तीरुवन्तपुरम येथील 'मार्गी' हि संस्था सुध्दाकुडियाटट्मचे शिक्षण देणारी संस्था म्हणून पुढे आलेली आपणास दिसते। केरळ प्रांतात कुडियाटट्म चे अस्तित्व अबाधित ठेवण्यास काही लोकांचा मोलाचा वाट आहे। ज्यात प्रसिध्द संस्कृत नाटय तज्ञ मंडळीआहे जसे कि डी.आप्पाकुटट्न नायर, के.पी. नारायणा पिसारेड्डी, के.अय्यपा पणिक्कर ह्यांनी हि केला केरळ मध्ये साहित्य व प्रत्यक्षिक स्वरुपात जागरूक ठेवली व विविध संस्थे मार्फत ते आजही त्याला जिवंत ठेवण्यात अविरत प्रयत्न करताना दिसतात।

कुडियाटट्म ह्या कलेशी संबंधित असलेले काही कला प्रकार आपणास पाहावे लागेल जे त्यातूनच निर्माण झालेले आहेजसे कि, मंत्रकम् कुथू, अनगुलीयन् कुथू, मत्तविलास कुथू, पुरुषार्थ कुथू, चाक्यारकुथू, नांगीयार कुथू, पटकम् ह्या सर्व कला प्रकारचा उद्‌गम हा फक्त कुडियाटट्म हा आहे ह्या कला प्रकारात प्रामुख्याने संगीताचे अनोखे महत्व आहे। कारण संगीत हि ह्या कला प्रकारची जणू आत्माच आहे, असे दिसते। त्यातील हजारो वर्षापूर्वी ची पारंपारिक वाद्‌य आपला बाज व त्या पासून होणारा नाद वातावरणात एक वेगळाच भाव निर्माण करण्यासाठी सक्षम आहे, व आजही हा कला प्रकार पहताना तेच तसेच वातावरण सर्वांना प्रभावित करताना दिसते। संगीत वाद्‌य हे पारंपारिक पद्धतीनेच निर्मिलेले आपण आजही पाहू शकतो त्यात आजही कोणती आधुनिक वस्तूंचा वापर केलेला नाही। हे विशेष त्यातील प्रमुख वाद्‌य म्हणजे मिझावू, तिमिला, कुरुमकुझल, शंख, इद्दका, मंजिरा अश्या प्रकारची वाद वाजवायला त्याचे विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे, व हे प्रशिक्षण फक्त आपणास चाक्यार समूह देवू शकतो।

कुडियाटट्म रंग शैली ची प्राचीनता ह्या भासांचा नाटका एवढीच प्राचीन व गूढ राहिलेली आहे इकडे संपूर्ण नाटय-जग भासांच्या नाटकाचे शोध घेत होत व तिकडे कुडियाटट्म शैलीत भासांचे नाटक चाक्यार समूह मंदिरात नाटक प्रस्तुत करत होते। जेंव्हा 1912 मध्ये टी.गणपती शास्त्री ह्यांनी भासांच्या नाटकच केरळ मध्ये शोध सुरु केला व त्यांचे 'त्रिवेद्रम प्लेज' म्हणून भासांची नाटके प्रसिध्द केली, तेंव्हा अनेक रंगकर्मीना हे पण लक्षात नव्हते कि भासांच्या नाटकचे वेग-वेगळे अंक चाक्यार समूह अनेक शतकांपासून

केरळ च्या मंदिरात खेळत आहेत। शिवाय ह्या रचना कोणाच्या, कोणी लिहिल्या असेल ह्या पासून चाक्यार समूह हा अनभिन्न होता तो फक्त परंपरेचा मागे चालत त्याचे अनुकरण करत होता तेही पिढयानपिढया। असे असून सुध्दा गणपती शास्त्री सुध्दा 'त्रिवेद्रम प्लेज' प्रसिध्द झाल्यावर त्यांना ह्या विषयी माहिती झाली हे विशेष।

कुडियाटट्म रंगशैली मध्ये 20 नाटक खेळल्या जातात त्यापैकी भासांची नाटके त्या शिवाय शक्तीभद्र, बोधायन,कुलशेखर वर्मन, श्रीहर्ष, महेंद्र-विक्रम पल्लव व निलकांत ह्यांचे सुध्दा नाटक ह्या रंगमंचावर प्रस्तुत केल्या जातात। ज्यामध्ये आंगिक।वाचिक,आहार्य,सात्विक ह्यांचा पुरेपूर उपयोग होताना दिसतो।[4]

जर आपण फक्त भासांच्या नाटकाचा विचार केला तर सर्वात जास्त भासंचेच नाटक खेळल्या गेल्याचे आपणास दिसून येईल कारण एकूण 20 नाटकापैकी भासांच्या 13 नाटकातील 35 अंक अनेक शतकाच्या वारसा हक्क घेवून चाक्यार वर्ग केरळ ची रंगभूमी गाजवताना दिसतात।

जेंव्हा शोधार्थी ह्यांनी त्या नाटकची विश्लेषण केले तर ते सर्व अंक भासांच्या कोणत्या न कोणत्या नाटकाचा एक अंक राहिलेला असल्याचे त्यांना दिसले। चाक्यार नट समूह ज्या अंकाचे मंचन करत होते ते सर्व आपण काढून पाहिल्यास त्याचे भासांच्या नाटकाशी संबंध असल्याचे समोर येईल ते खालील प्रमाणे,

| | |
|---|---|
| 1 प्रतिमा नाटकम् | विच्छीन्नभिषेकनकम्, विलापकम्, प्रतिमानाटकम्,अतवैमानकम्, रावणकम्, भरतकम् व अभिषेकनकम् हे सात अंक प्रतिमा नाटकातील आहेत |
| 2) अभिषेक नाटकम् | बालीवधम्, हनुमद्दुतनकम्,तोरणयुध्दबकम्, समुद्रतारनकम्, मायासितानकम्, पट्टाभिषेकनकम् हे सहा अंक |
| 3) प्रतिज्ञा योगांधारायण | महासेननकम्, मन्त्रकम्, अरटट्नकम्, हे तीन अंकप्रतिज्ञा योगांधारायण ह्या नाटकातील आहेत। |
| 4) स्वप्न-वासवदत्ता | ब्रह्मर्यनकम्, पन्थात्तनकम्, पत्तूदमनकम्, शैफालीकम्,स्वप्नकम् चित्रफलनकम् हि स्वप्न नाटकातील अंक |
| 5) चारुदत्त | वसंतसेनाकम् हा एक अंक ह्या नाटकातला आहे |
| 6) अविमारक | अनोरतनकम्, दुतनकम्, अभिसारीकानकम्, पर्वनकम्,मदमत्तनकम् हे अविमारक नाटकातील अंक |

या शिवाय भास ह्यांचे दुतवाक्य, दूतघटोत्कच, कर्णभारम, उरुभंगम् व मध्यम व्यायोग हे पण अंकाचा माध्यमातून खेळले जातात।

भास महाभारत व रामायण ह्यांच्या एका घटनेवर संपूर्ण नाटक लिहितात, चाक्यार पण संपूर्ण नाटक प्रस्तुत न-करता एका अंकाला विस्तारत जातात व अभिनयाचा विस्तार करतात हि युक्ती चाक्यारांनी जणू काही भासांकडूनच घेतली असावी असे दिसते,

अनेक भारतीय विद्वानाने जो महत्वपूर्ण भासांची विशेषता रेखांकित केली ती म्हणजे 'नाटयपाठ' ह्याची संशिप्तता आहे। भास विषयींचे जाणकार अप्पूकुटट्न नायर म्हणतात कि, "भास अपनी अभिव्यक्ती मी अत्यंत संशिप्त और नपे-तुले है । वे उन चीजो के सहारे काही अधिक कहते हे जिन्हे कहते नाही बजाये जिन्हे वो करते है । वे मौन के पुरोधा है, उनका यह मौन अर्थगर्भित है।"[5]

नाट्याशास्त्र तज्ञ कमलेश दत्त त्रिपाठी म्हणतात कि,"भास के नाटक मी संशिप्त पाठ (minimum text) है। आंगिक,वाचिक,आहार्य,व सात्विक अभिनय के द्वारा उसका विस्तार कारण सहज है। अभिनय का याह विस्तार 'कुडियाटट्म' शैली मे साफ नजर आता है।"[6]

संस्कृत नाटय परंपरा ह्याच्या मोठया जगतात कालिदास, भवभूती,शूद्रक, ह्या सारखे महान नाटककार सोडून चाक्यार नट-वर्ग ह्यांनी भासांचीच नाटके का निवडली असेल, ह्याचावर विवेचन करतांना अप्पूकुटट्न नायर म्हणतात कि, "अपने नाटकों में कालिदास हमें भीनी गंध बिखेरता पूरी तरह खिला हुआ गुलदस्ता थमाते हैं, पर भास हमें पुष्पित हो सकने वाले उस वृक्ष के सिर्फ बीज देते हैं, जो भले ही छोटे हों, लेकिन ठीक भूमि में बोये जाएँ और चौकस माली ठीक देखभाल करेगा, वे वृक्ष में परिणत हो हमें हमेशा के लिये गंध और सुंदरता प्रदान करेगा। कालिदास के फूल मुरझा सकते हैं, क्योंकि वे कालिदास के हाथों ही अपने सौंदर्य के चरम पर पंहुचे हैं, लेकीन भास ने जो बीज चाक्यारों को सौंपे हैं, अगर उसे पूरा सहयोग मिले, परवरिश मिले और धैर्य, विवेक हो तो परिणाम फलप्रद होता है।"[7]

ह्यावरून भास हा 'कुडियाटट्म' शैली साठी किती उपयुक्त होता हे सहज समजण्यासारखे आहे। माझ्या केरळ येथील अभ्यास दौयात मा. डॉ.वेणुगोपाल ह्यांचाशी मुलाखत झाली ते एक प्रख्यात 'कुडियाटट्म' ह्याचे जाणकार आहेत शिवाय तीरुवनतापुरम येथील मार्गी ह्या कुडियाटट्म सेंटर चे प्रमुख आहेत त्यांनी 'कुडियाटट्म' ह्यावर नदमेबव ह्या जागतिक संघटनेच्या मदतीने kudiyattam register नावाचे संपूर्ण माहिती असलेले पुस्तक लिहिले आहे।

त्यांनी सांगितले कि भासांचा नाटकातील प्रयोगात्मक मूल्य व नाटकाची संशिप्तता ह्यामुळे चक्यार नट-समूहाला त्यावर नाटके करणे सोयीचे झाले। भासानी नाटकात खूप जागा दिली ज्याला सहज वाढवता येणे शक्य आहे।म्हणूनच चाक्यार संप्रदाय एक-एक वर्ष फक्त एकच नाटक मंदिरात खेळू शकतो ते फक्त भासांच्या नाटकामुळेच। त्यांनी सांगताना म्हंटले आहे कि, केरळ चे अनेक कलावंत अभिनवगुप्त ह्यांच्या काळात काश्मीर मध्ये जाऊन नाटय समजावून घेतांना दिसतात शिवाय असे अभिनवभारती च्या प्रस्थावानेत नमूद आहे असे ते सांगत होते, त्यामुळे उत्तर-भारताचा, दक्षिण भारताशी एक घनिष्ट संबंध होता, व रामायण काळापासून ते आज पर्यंत आपण ते पाहत आहोत, चाक्यार समूहाकडे ह्या संहिता कश्या आल्या हे एक मोठे रहस्य आहे पण केरळ चे सम्राट ह्यांच्या अनेक कृतीतून व oriental manuscript library Kerala येथील काही अधिकार्याचा मते ह्या संहिता राजांनी त्यांचा कडे आलेल्या रंगमडळी कडून आवडलेल्या नाटक लिहून घेतले असावे कारण त्यांना मल्याळी संस्कृती टिकवायची होती, तसेच त्यांनी संस्कुत नाटके आवर्जून संरक्षित करून ठेवलेली आजही दिसते, व यासाठी स्वतःचे मोठे

शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
17 फरवरी 2021
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

महाल दिल्याचेही आज आपण तीरुवंतपुरम येथे पाहतो। तरीही आजही ह्याचे पुरावे शोधणे व अभ्यासाने गरजेचे आहे।

निष्कर्ष

आज भासांचे नाटक व 'कुडियाटट्म' हि शैली एकजीव वाटते ते चाक्यार समूहाने त्यात आणलेला जिवंतपणा व केरळ येथील संस्कृतीची पकड ह्यातून भास व 'कुडियाटट्म' शैली एकजीव झाली आहे ह्यात वाद नाही। म्हणूनच 'कुडियाटट्म' ह्या शैलीची विशेषता हि फक्त भासंचाच नाटकामुळे आली असे म्हणणे अतिशयोक्ती युक्त होणार नाही, असे मला वाटते।

सन्दर्भ ग्रन्थ

*1 संगीत नाटक अकादमीः स्पेशल इशू क्र - 111-114 (कूडियाट्टम) (पा.क्र. 7)*

*2 कुडियाट्टम रजिस्टर -न्दमेबव । ड।त्ळप् तिरूवन्तपुरम(पा.क्र. 21)*

*3 कुडियाट्टम रजिस्टर -न्दमेबव । ड।त्ळप् तिरूवन्तपुरम प्रस्तावना*

*4 भास का रंगमंच (पा।क्र। 72)*

*5 भास का रंगमंच (पा।क्र। 73)*

*6 भास का रंगमंच (पा।क्र। 74)*

*7 भास का रंगमंच (पा।क्र। 74)*

ब हिंदी ग्रंथसुची

*1 भास का रंगमंच -संगीता गुंदेंचा-न्यु। भारतीय बुक कार्पोरेषन दिल्ली -2004।*

*2 महाकवी भास -बलदेव उपाध्याय -राजकीय महाविदयालय ग्रंथालयकोटा राजस्थान बुक क्र। 80986 -*

*3 कावालन नारायण पणिक्कर-संगीता गुंदेंचा-वाणी प्रकाषन दिल्ली - 2016।*

क इंग्रजी ग्रंथसूची

*1 Kuthambalam And Kuddiyattam - Goverdhan Panchal - Sna - New Delhi - 1984.*

*2 Kutiyattam Register - Dr. P. Venugopalan Margi - Thiruvananthapuram - 2007.*

*3 Bhasa Natyachakram - Prof. Devdhar - Puna Oriental Book Agency Puna - 1937*